जा.क्र:- नाजिसुरमं/अध्यक्ष/वि.भ.२०२३/१३९४
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक.
१ ला मजला. झंन्कार हॉटेल गंजमाळ बस स्टॉप,
कामगार न्यायालयाजवळ, नाशिक ४२२ ००१.
दूरध्वनी क्र : ०२५३-२५९००३१.
दिनांक : १८/०५/२०२३

**आदेश**

**विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील सुट प्राप्त सुरक्षा रक्षक / अधिकारी यांचे वेतन व भत्त्यांमध्ये दि. १ मे २०२३ पासून सुधारणा करणेबाबत.**

सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते निश्चित करण्याबाबत, खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) २०२२ मधील खंड ३० मधील तरतुदीनुसार मंडळास अधिकार प्रदान करण्यांत आले आहेत. सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्यासाठी मंडळाने किमान वेतन अधिनियम. १९४८ अंतर्गत "दुकाने व व्यापारी आस्थापना" मधील कामगारांना लागू असलेले किमान वेतनाचे दर हे आधारभूत प्रमाण मानण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यानुसार सदर अनुसूचित उद्योगधंद्यामधील कामगारांसाठी शासनातर्फे वेळोवेळी जाहीर होणारा विशेष भत्ता मंडळातील नोंदीत व सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांना अदा करण्यांत येतो. त्याचप्रमाणे सुरक्षा रक्षकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सुरक्षा रक्षक संघटनांनी केलेल्या मागणीनुसार सुरक्षा रक्षकांच्या वेतनात वेळोवेळी वाढ करण्यांत आलेली आहे. मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे व सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांचे सध्याचे एकूण वेतन रु. १४९८२ इतके आहे.

मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते यामध्ये वाढ करणेसाठी विविध सुरक्षा रक्षक संघटनांनी निवेदनाद्वारे केलेल्या मागणीसंदर्भात, मंडळाने महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत) २००२ मधील खंड ३० चे उपखंड (२) मधील तरतुदीनुसार. मंडळाने दि. ११.०१०.२०२१ रोजीच्या जाहीर सुचनेद्वारे सर्व नोंदीत आस्थापनांना वेतनवाढी बाबत कळविण्यात येऊन सुरक्षा रक्षकांची प्रस्तावीत वेतनवाढ जाहीर केलेली होती. व सदर जाहीर सूचनेद्वारे नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ. नाशिक यांच्या कार्यक्षेत्रामधील मुख्य मालकांच्या विविध संघटना / असोसिएशन्स व सुरक्षा रक्षक आणि त्यांच्या कामगार संघटना यांना सदर जाहीर सूचनेमधील प्रस्तवित केलेल्या वेतनवाढीबाबत आपल्या काही सूचना व हरकती असल्यास मंडळास सात दिवसांच्या आत सादर करण्याचे आवाहन करण्यांत आले होते.

मुख्य मालक / प्रमुख नियोक्ता व सुरक्षा रक्षक संघटना यांनी मंडळास प्रस्तावित केलेल्या वेतनवाढीच्या अनुषंगाने मंडळास प्राप्त झालेल्या सूचना व हरकती विचारात घेऊन दि. ०८.०६.२०२२ रोजीच्या शासनाच्या निर्देशानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीने दि. २२.०९.२०२२ रोजी वेतनवाढ प्रस्तावित केली होती.

सदर प्रस्तावास अनुसरुन शासनाने मंडळातील सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्त्याच्या वाढीबाबत मंडळास शासन पत्र क्र. सुरक्षा / वेतनवाढप्रस्ताव / २०२३ / कार्या.- १४-१६३. दि. ०९.०५.२०२३ अन्वये

Scanned with CamScanner

निर्देशित करण्यांत आले आहे की. सुरक्षा रक्षकांच्या माहे मे २०२३ पासूनच्या वेतनवाढीबाबत महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम. १९८१ व खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ च्या तरतुदीनुसार व यासंदर्भातील सर्व कायद्यानुसार व विषयानुसार काटेकोरपणे कारवाई करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. **शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना लागू करण्यात आलेली सुधारीत वेतनवाढ ही मंडळातील नोंदीत सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांना देखील लागू होते. त्यानुसार सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत मंडळाने दि. १६.०५.२०२३ रोजीच्या एकसदस्यीय बैठकीमध्ये ठरावाद्वारे निर्णय घेतला असून सुधारीत वेतन व भत्ते १ मे २०२३ पासून पुढील तीन वर्षाकरीता खालील प्रमाणे निश्चित करण्यांत आलेले आहेत.**

## सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांना दि. ०१.०५.२०२३ पासून सुधारीत वेतन महागाई भत्त्यासह लागू करण्यात आलेले वेतन व भत्ते

| अ.क्र. | पद | मुळवेतन | विषेशभत्ता/ महागाईभत्ता | घरभाडेभत्ता (३+४) ५% | प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | शैक्षणीक भत्ता | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | सुरक्षा पर्यवेक्षक | १२८७९ | २४४४ | ७६६ | १३०० | २९४ | ३०० | १७९८३ |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १२१०३ | २४४४ | ७२७ | १३०० | २९४ | ३०० | १७१६८ |
| ३ | सुरक्षा रक्षक | ११२६८ | २४४४ | ६८६ | १३०० | २९४ | ३०० | १६२९२ |

* किमान वेतन = मुळवेतन + विषेश भत्ता / महागाई भत्ता

सुट प्राप्त एजन्सी मालकांनी सुरक्षा रक्षक / **मुख्य** सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक/यांना पुढील प्रमाणे इतर फायदे/लाभ देणे बंधन कारक आहे.

१) **सानुग्रह अनुदान :** किमान वेतनाच्या १०% २) **उपदान :** किमान वेतनाच्या ४ % ३) **भरपगारी रजा :** किमान वेतनाच्या ६ % ४) **भरपगारी सुट्टी :** किमान वेतनाच्या १ %.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांच्या किमान वेतनावरील ३% लेव्ही दरमहा ५ तारखेपर्यंत मंडळात आर.टी.जी.एस. / DD द्वारे / धनादेशा द्वारे जमा करणे बंधन कारक आहे. सबब, मंडळातील सर्व नोंदीत सुट प्राप्त एजन्सी मालकांना या द्वारे असे सुचित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांना दि. ०१.०५.२०२३ पासून सुधारीत वाढीव वेतनासह व विषेश भत्ता / महागाई भत्त्याच्या फरकासह रक्कम विनाविलंब सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांना अदा करावी. तसेच सुधारीत वेतनाबाबत प्रशासकीय सुट प्राप्त लेव्हीच्या फरकाची रक्कम मंडळाकडे विनाविलंब जमा करावी.**

कामगार उप आयुक्त तथा अध्यक्ष
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक.

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

प्रति, SIS Ltd.
Nashik
9226123371
G.m / chav.

नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ — महाराष्ट्र शासन स्थापित — नाशिक